## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ९७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०२/२०१७

**१) संगनमत करुन सेफ महाबचत गटात दामदुप्पट करुन देतो अशी आमीष दाखवुन सभासदाची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०१/१२/२०१० ते मे २०१६ पर्यत यातील दोनही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी व कुमारी यामीनी बारापात्रे रा. दिघोरी तसेच इतर सभासदांना आर्डी एफडी व्दारे सेफ महाबचत गटात पैसे भरुन साडेतीन वर्षात, व साडेसात वर्षात दामदुप्पट करुन देतो असे आमीष दाखवुन फिर्यादी व सभासदाकडुन एकुण ११,१०,९४० /—रु. चे मार्फतीने सेफ महाबचत गटात भरवुन घेवुन आर्डी एफडीची मुदत संपली असुन वरील रक्कम देण्यास नकार दिल्याने फिर्यादी व ईतर सभासदांची फसवणुक केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ४२०,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. यादव पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी. :—**

दिनांक ०८/०२/२०१७ चे ०२.४५ वा. दरम्यान. यातील फिर्यादी हरीकिशन चंद्रभान अंबादे वय ४३ वर्ष, रा. विदर्भ हाऊसिंग कॉलोनी तकीया वार्ड भंडारा हे कामानिमीत्त जि. पं. कार्यालय येथे आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६ ई किंमती ८२८५ हिरो होंडा शाईन काळया रंगाची कि. ३५,०००/—रु. ची पार्कीगचे ठिकाणी हॅन्डल लॉक करुन ठेवुन गेला असता काम आटोपुन मोटार सायकल ठेवलेल्या ठिकाणी परत आला असता मोटार सायकल दिसुन आली नाही मोटार सायकल कोणीतरी अज्ञात चोराने मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) शिवीगाळ करुन लोखंडी विडयाने व काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०७/०२/२०१७ चे २३.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादी विजु भैया नागोसे वय २४ वर्ष, रा. दवडीपार ह. मु. भोजापुर हा मंजुरीचे कामावरुन घरी गेला असता आरोपी हिने तुम्ही दारु पिवुन आले असे म्हणुन भांडण करुन मिरची पावडर अंगावर फेकुन भाजीपाला कापण्याची लोखंडी (विरा) ने फिर्यादीचे डोक्याचे मागील बाजुला मानेच्या वर मारुन जखमी केले तसेच काठीने मारपीट करुन शिवीगाळ केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेंपुंजे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) क्षुल्लक कारणावरुन मारपीट शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०७/०२/२०१७ चे २३.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादी सौ. उत्तम बोन्द्रे वय ३५ वर्ष, रा. दवडीपार ह. मु. भोजापुर ही आरोपी सोबत राहत असुन यातील आरोपीने तु माझ्या आधी कु. स्विटी हिला जेवण का दिले याकारणावरुन भांडण करुन फिर्यादीचे मस्तकावर काठीने मारुन जखमी करुन शिविगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४,५०६ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेंपुंजे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

PSI

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म. रा.)

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.